# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.____________ दिनांक : २१/१०/२०१६

<u>प्रसिद्धीकरिता</u>

# प्रभाग क्र. ५०मधील अर्धवर्तुळाकार चौकाच्या नामकरण प्रस्तावास 'धर्मराज्य पक्षा'चा विरोध

ठाणे (प्रतिनिधी) : ठाणे महानगरपालिकेच्या नुकत्याच संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील, प्रश्न क्र. ३०० अंतर्गत प्रभाग क्र. ५०मधील एम.टी.एन.एल. टॉवर व सबस्टेशन जवळील अर्धवर्तुळाकार चौकाचे 'कन्हैय्यालाल धांडूमल खेतवानी चौक' असे नामकरण करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, 'धर्मराज्य पक्षा'ने या प्रस्तावास आक्षेप घेत आपला तीव्र विरोध दर्शविला आहे.

प्रभाग क्रमांक ५० येथील बहुतांश वस्ती ही स्थानिक भूमिपुत्र असलेल्या आगरी समाजाची आहे. 'कोपरी गाव' नावाने या वसाहतीला ऐतिहासिक पार्श्वभूमीही आहे, त्यामुळे, कोपरी गावातील सुजाण व सामाजिक नेतृत्त्व लाभलेल्या एखाद्या स्थानिक भूमिपुत्राचे नाव सदर प्रस्तावित चौकास देण्यात यावे, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे आणि कोपरी विभाग अध्यक्ष आनंद कोळी यांनी ठाणे महापालिकेचे आयुक्त संजीव जयस्वाल यांना पाठविलेल्या पत्रात ठामपणे केली आहे. शिवाय याप्रकरणी कोपरी गावातील स्थानिक ज्येष्ठ नागरिकांचे जनमत जाणून घेऊन, एखाद्या सुयोग्य व्यक्तीचे नाव निश्चित केल्यास ते कौतुकास्पद ठरेल, असेही आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

"धर्मराज्य पक्ष" अशापद्धतीच्या पक्षपाती तसेच स्थानिक भूमिपुत्रांना डावलून सादर करीत असलेल्या नामकरण प्रस्तावास जाहीर विरोध करत असून, यासंदर्भात आयुक्तांनी योग्य भूमिका घेऊन, ही नामकरण कोंडी सोडवावी. अन्यथा, कोपरी गावातील स्थानिक नागरिकांच्यावतीने 'धर्मराज्य पक्ष' प्रशासनाविरोधात तीव्र जनआंदोलन उभारेल असा इशारा विनोद मोरे आणि आनंद कोळी यांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात शेवटी दिला आहे.

ए/ए२०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस्
को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२,
ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग,
द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०.
दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*